# पुणे महानगर परिवहन महामंडळ

## प्रेसनोट

# हिंजवडी माण फेज ३ मेगा पॉलिस ते सांगवी या नवीन बस मार्गाचा शुभारंभ.

पुणे महानगर परिवहन महामंडळाकडुन हिंजवडी माण फेज ३ मेगा पॉलिस ते सांगवी (मार्ग क्रमांक - ३७३) या नवीन बस मार्गाचा शुभारंभ सांगवी येथे रविवार, दिनांक ११ ऑगस्ट २०२४ रोजी सकाळी ११:०० वाजता पिंपरी – चिंचवडच्या माजी महापौर मा. माई ढोरे यांच्या शुभहस्ते संपन्न झाला.

यावेळी पिंपरी – चिंचवडच्या माजी नगरसेवक मा. शारदा सोनवणे, मा.श्री. हर्षल ढोरे, मा. श्री.संतोष कांबळे, सामाजिक कार्यकर्ते मा.श्री. राजू साळवे व पिंपरी आगाराचे आगारव्यवस्थापक श्री. भास्कर दहातोंडे यांची प्रमुख उपस्थिती होती.

पुणे महानगर परिवहन महामंडळाने प्रवासी वर्गाची वाढती मागणीची दखल घेऊन हिंजवडी माण फेज ३ मेगा पॉलिस ते सांगवी (मार्ग क्रमांक - ३७३) हा नवीन बसमार्ग सुरू केला असुन आय.टी. कर्मचारी व प्रवासी नागरिक यांचे करीता एक चांगली सुविधा उपलब्ध होणार आहे. सदरची बससेवा सुरू झाल्यामुळे आम्हाला मोठा दिलासा मिळणार आहे, अशी भावना यावेळी प्रवासी नागरिक यांनी व्यक्त केली.

मार्ग क्रमांक ३७३ - हिंजवडी माण फेज ३ मेगा पॉलिस ते सांगवी या बससेवेचा मार्ग साई चौक नवी सांगवी, काटेपूरम चौक, पिंपळेगुरव, पिंपळे सौदागर चौक, रहाटणीगांव, काळेवाडी फाटा, मानकर चौक, वाकड, इन्फोसिस फेज – १, इन्फोसिस फेज – २, हिंजवडी माण फेज-३ सर्कल, मेगा पॉलिस फेज-३ असा असणार आहे. हिंजवडी माण फेज ३ मेगा पॉलिस ते सांगवी पहिली बस सकाळी ०६.०० वा. तर शेवटची बस संध्याकाळी ०६.०० वा. आहे. तसेच सांगवी ते हिंजवडी माण फेज ३ मेगा पॉलिस पहिली बस सकाळी ०७.२० वा. तर शेवटची बस रात्री ०७.२५ वा. आहे.

---

दि. ११/०८/२०२४.

मा. संपादक,
दैनिक ..........
यांजकडेस...

महोदय,

वरील प्रेसनोट नागरिकांच्या माहितीसाठी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिद्ध होणेविषयी विनंती आहे.

मा. स. कळावे.

sd/-
कामगार व जनता संपर्क अधिकारी
पुणे महानगर परिवहन महामंडळ लि.